अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :- ११.०१.२०२४

# -: प्रेसनोट :-

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | १/२०२४ |
| ३ | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -१९८८ |
| ४ | आलोसेचे नांव कार्यालयाचा पत्ता | १) शिरीष कारभारी दगडखैर, ३५ वर्षे, कनिष्ठ अवेक्षक ,<br>२) नितीन माणिक माबळे, ४७ वर्षे, मुकादम ,<br>नेमणूक - घनकचरा व्यवस्थापन खाते, एल वार्ड , बीएमसी कार्यालय , कुर्ला (प) मुंबई. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १२,०००/- तडजोडीअंती रुपये १०,०००/- |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रूपये १०,०००/- |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रूपये १०,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार हे एका महिला बचत गट संस्थेचे पर्यवेक्षक म्हणून काम पाहतात. नमूद संस्थेस मुंबई महानगरपालिकेच्या विभागातील धनकचरा व्यवस्थापन विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानांतर्गत टेंडरद्वारे स्वच्छता कामाचे कंत्राट देण्यात आलेले आहे. तक्रारदार यांच्या संस्थेमार्फत केलेल्या स्वच्छता कामाचे बिल मंजूर करण्याकरिता आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येकी रूपये ३,०००/- प्रमाणे चार मासिक बिलाच्या मंजुरीसाठी रुपये १२,०००/- इतक्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ९/१/२०२४ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे लेखी तक्रार दिली होती.<br><br>दिनांक १०/०१/२०२४ रोजी आयोजित केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांनी तक्रारदार यांचेकडे स्वच्छता कामाचे बिल मंजूर करण्यासाठी तडजोडीअंती प्रति बिल रू २,५००/- प्रमाणे असे एकूण चार बिलांचे रुपये १०,०००/- इतक्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांच्या सांगण्यावरून लाचेची रक्कम स्वीकारताना आलोसे क्र.२ यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणून नमूद लोकसेवकां विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी :-** **श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. भागवत सोनावणे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणी करणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०

संकेतस्थळ - acbmaharastra.gov.in,

ईमेल- 1) acbwebmail@mahapolice.gov.in, 2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net. **टोल फ्रि. क.** १०६४

**दुरध्वनी क.** ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००